**पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**दिनांक १७/०७/२०१७ (सोमवार)**
**(संध्याकाळ)**

---

## अकस्मात मुत्यु

**पो.स्टे.मौदा** :- अंतर्गत १२ कि.मी. अंतरावर एनटीपीसी मौदा येथे दिनांक १९/०६/२०१७ चे २२. ३० वा. दरम्यान यातील **मृतक नामे- सत्तारअली जावेक अली, वय ४५ वर्ष, रा. आनंदीपुर वेस्ट बंगाल** हा एनटीपीसी मौदा कंपनीत कामावर असतांना कमरेच्या सेफटी बेल्ट तुटल्याने २० मिटर उंची वरून खाली पडल्याने मृतकाच्या डोक्याला व गळयाला गंभीर मार लागल्याने उपचारा करीता ऑरेंज सिटी हॉस्पीटल, नागपुर येथे भर्ती केले असता उपचारा दरम्यान मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे-मो. हफीक सत्तारअली, वय २६ वर्ष, रा. आनंदीपुर वेस्ट बंगाल व यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे कलम १७४ जाफौ कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री. अजय अहिरकर हे करीत आहे.

## जबरी चोरी

**पो.स्टे. मौदा** :- अंतर्गत १० कि.मी. अंतरावर बाबदेव, त. मौदा येथे दिनांक १६/०७/२०१७ चे २२. ३० वाजता दरम्यान यातील आरोपी नामे- बोलेरो गाडी क्र. एमएच २१/ सी २१३२ चा चालक व इतर तीन यांने फिर्यादी नामे- पंकज कृष्णाजी बोंदरे, वय २४ वर्ष, रा. बाबदेव, त. मौदा हा घटनास्थळावर आपले काम आटपुन आपल्या गावी बाबदेवला मोटरसायकल ने जात असता यातील बोलेरो चालकाने आपली गाडी समोर घेऊन नंतर पुढे रस्ता बंद असल्याने गाडी मागे घेऊन फिर्यादीचे मोटरसायकल जवळ थांबवुन गाडीतील दोन इसम फिर्यादीस शिवीगाळ करून मारपीट करून फियादीचे खिश्यातील विवो कंपनीचा मोबाईल किमंती १८,०००/-रू. चे जबरीने हिसकावुन चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३९२, ३४ भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे . गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री. अजय अहिरकर हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**